नगरपरिषदांच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना व मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना निवृत्ती वेतनविषयक लाभ वेळेवर मिळणेबाबत...

20 JUN 2013
2704
क्रमांक

6

# महाराष्ट्र शासन
## नगर विकास विभाग

शासन परिपत्रक क्र. एमसीओ २०११/प्र.क्र.१३७/पुर्नबांधणी/नवि १४
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १३ जून, २०१२.

**परिपत्रक**

राज्यातील नगरपरिषदांमधून सेवा निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना किंवा मृत्यू पावलेल्या कर्मचा-यांच्या वारसांना नगरपरिषदांकडून निवृत्ती वेतन, उपदान, अंशराशीकरण, रजा रोखीकरण, वेतन आयोगाच्या फरकाच्या रक्कमा, भविष्य निर्वाह निधीच्या रक्कमा, गट विमा योजनेच्या देय रक्कमा वेळेवर मिळणे आवश्यक असताना काही प्रकरणी त्यात विलंब होत असल्याचे निर्दशनास आले आहे.

०२. राज्यातील सर्व नगरपरिषदांना शासन यापुर्वी देत असलेले जकात अनुदान व महागाई भत्ता अनुदान बंद करुन त्याऐवजी नगरपालिका सहाय्यक अनुदान देण्याचा निर्णय शासन निर्णय क्र. संकीर्ण २००९/ प्र.क्र. १०६/०९/नवि १४, दि. ३१ ऑगस्ट, २००९ अन्वये शासनाने घेतला आहे. उक्त शासन निर्णयामध्ये नगरपरिषदांमधील कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन व भत्ते यानंतर निवृत्त नगरपरिषद कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्ती वेतन व भत्ते अदा करण्यासाठी नगरपालिका सहाय्यक अनुदानाचा विनियोग प्राधान्याने करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

०३. निवृत्ती वेतन विषयक देय रक्कमा अदा करण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकानुसार ज्येष्ठता यादी प्रत्येक नगरपरिषदेने तयार करावी. नगरपरिषदेकडे पुरेसा निधी उपलब्ध असल्यास निवृत्तीविषयक देय रक्कमा संबधितांना सेवानिवृत्तीच्या वेळीच अदा कराव्यात. तथापि, यासाठी पुरेसा निधी नगरपरिषदेकडे उपलब्ध नसल्यास सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीच्या ज्येष्ठता क्रमवारीनुसार सर्वदेय रक्कमा प्रदान कराव्यात. मात्र क्रमवारीमधील एखाद्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचे जर निधन झाले असेल तर त्यास प्रथम प्राधान्याने निवृत्ती वेतनाच्या रक्कमा द्याव्यात आणि मयत कर्मचाऱ्यांपैकीसुद्धा ज्या मयत कर्मचाऱ्याच्या वारसदारास अनुकंपा तत्वावर नोकरी दिलेली

असेल त्यापेक्षा ज्या मयत कर्मचाऱ्याच्या वारसदारास अनुकंपा तत्वावर नोकरी देण्यात आली नाही अशा प्रकरणास प्रथम प्राधान्य देण्यात यावे.

०४. वरील सुचनांप्रमाणे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना किंवा त्यांच्या वारसांना वेळेवर निवृत्ती वेतन व इतर निवृत्ती विषयक लाभ मिळतील हे सुनिश्चित करण्याची व्यक्तीशः जबाबदारी सर्व मुख्याधिकारी यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(कैलास गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनाय, वरळी, मुंबई ०३०.

२) सर्व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय

३) सर्व जिल्हाधिकारी.

४) सर्व नगरपरिषद मुख्याधिकारी

५) कार्यासन नवि १५, १६, १७, १८, १९

-------